**शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण ,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१.**

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांमध्ये उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी जाहीर आवाहन.

सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र शासनातर्फे सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी एकत्रित संकेतस्थळ विकसीत करण्यात आलेले आहे. महाडीबीटी हे या संकेतस्थळाचे नाव असून http://mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ संचालक, माहिती व तंत्रज्ञान (DIT) यांचे मार्फत नव्याने कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण या विभागाच्या खालील शिष्यवृत्ती योजनांचा समावेश या संकेतस्थळामध्ये करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| १.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | २.डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| ३.राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | ४.गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ५.शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | ६.एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ७.गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (कनिष्ठ स्तर) | ८.गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य(वरिष्ठ स्तर) |
| ९.राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | १०.शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ११.जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | १२.माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| १३.स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | १४.राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (DHE) |

सदर डीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यावर त्यांना देय होणारे शिष्यवृत्ती निर्वाह भत्ता शिक्षण फी परिक्षा फी इतर अनुज्ञेय फी त्यांचे आधार संलग्न बँक खात्यावर थेट वितरीत केला जाणार आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी आपले आधारकार्ड क्रमांक आपल्या बँक खात्याशी संलग्न करुन घ्यावे.

| **महाडीबीटी ची वैशिष्टये** | **विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज भरणेकरिता मार्गदर्शक तत्वे** |
|---|---|
| १) लाभार्थी कोणत्याही वेळी कुठूनही महाडीबीटीच्या वेबसाईट वर नोंदणी करु शकतात.<br>२) लाभार्थी त्यांच्या स्वत:च्या अर्जाची स्थिती युजर आय डी ने पाहू शकतात.<br>३) सुलभ पडताळणी आणि पारदर्शकता यासाठी मार्क शिट,रहिवासी प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र इ. अपलोड करु शकतात.<br>४) महाडीबीटी प्रक्रियाच्या विविध स्तरावर विद्यार्थी आणि संस्थांना एसएमएस आणि ईमेल अलर्टची तरतूद.<br>५) विद्यार्थ्यांच्या बँकेच्या खात्यात शिष्यवृत्तीचे प्रत्यक्ष वितरण.<br>६) सुलभ शिष्यवृत्ती मंजूरीची प्रक्रिया.<br>७) भूमिका आधारित युनिक लॉगिन आयडी आणि पासवर्ड सर्वांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.<br>८) कोणत्याही स्वरुपाच्या तांत्रिक बाबीची अडचण उद्‌भवल्यास संकेतस्थळावरील टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्यास | १) वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाडीबीटी पोर्टल (संकेतस्थळ http://mahadbtmahait.gov.in) वर देण्यात आलेल्या युजर मॅन्युअल/एफ.ए.क्यु.चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टलवर दिलेल्या सूचनांचे पालन करुन अर्ज भरण्याच्या विहीत तारखेपर्यंत न थांबता संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावा.<br>२) अर्जदार शिष्यवृत्तीसाठी निर्धारित केलेल्या सर्व अटी लागू करण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी पात्र आहे याची खात्री करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची असेल.<br>३) जर अर्जदाराची पात्रता कोणत्याही टप्प्यावर अवैध आढळली तर त्याची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.<br>४) अर्जदाराने अंतिम: अर्ज जमा करण्यापूर्वी तपासावे की त्याच्या / तिच्या द्वारे प्रदान केलेले सर्व तपशिल योग्य आहेत कारण त्यानंतर माहीती संपादित करण्यासाठी कोणतीही तरतूद प्रणालीमध्ये नसेल.<br>५) शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करण्याची पध्दत केवळ ऑनलाईनच असेल.<br>६) "*" चिन्हासह जे रकाने चिन्हांकीत आहेत ते भरणे अनिवार्य असेल.<br>७) ज्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्रमांक मोबाईल क्रमांकाशी संलग्नीत नाहीत त्यांनी त्वरीत जवळच्या आधारकेंद्रावर जाऊन आपले आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी संलग्नीत करुन घ्यावेत. |

| | |
|---|---|
| कळविले आहे. (टोल फ्री क्र.०२२-४९१५०८००)<br>९) पात्रतेचे निकष महा-डीबीटी पोर्टलवर तसेच संचालनालयाचे संकेतस्थळ www.dhepune.gov.in वर देखिल उपलब्ध आहे. | |

**सर्व संस्थाच्या/महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सूचना देण्यात येते की,** उपरोक्त योजनांची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर कायमस्वरुपी लावावी. व पात्र विद्यार्थ्यांना वरील योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी सहकार्य करावे. व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेले अर्ज पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने छाननी करावी.

विद्यार्थ्यांचे आधार संलग्न बँक खात्यावर ही लाभाची रक्कम जमा केले बाबतची सूचना डीबीटी पोर्टलद्ववारे प्रत्येक महाविद्यालयाला दिली जाईल. त्यामुळे संबंधित विद्यापीठ/शैक्षणिक संस्था/महाविद्यालये यांनी कोणत्याही विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी अतिरीक्त शिक्षण शुल्काची रक्कम घेऊ नये.तसेच विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत शैक्षणिक संस्थेची राहील.

विद्यार्थ्यांनी दि. १५.११.२०१८ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरावेत. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरुन घ्यावयाची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थेची असेल.

स्वाक्षरित/-

**डॉ .धनराज माने**
शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,पुणे ०१